

जळंवी
बाळासाहेब शिंपी

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# जळंत्री

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

लघुपटकथा

# जळंत्री

## लेखक : बाळासाहेब सुधाकर शिंपी

# जळंत्री

लेखक : बाळासाहेब सुधाकर शिंपी
मेहरुण परिसर, जळगांव ता.जि.जळगांव. (खान्देश)
मो. नं. ९९२१७२९४७५.
ईमेल आयडीः- balasaheb.siddesh@gmail.com.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १८ जानेवारी २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.


!! श्री !!

श्री स्वामी समर्थ

**प्रस्तावना**

विज्ञानवृत्ती जोपासणारी, समाज
मनाला दिशा देणारी कथा

**“जळंत्री”**



अज्ञान, अशिक्षित असणारा माणूस अंधश्रध्देच्या मोहजालात स्वतःला अडकवत स्वतःची फसगत कशी करत असतो. ती फसगत आपल्या कुंटूबात तेढ निर्माण करुन सख्खे भाऊ एकमेकांचे वैरी होत असतात. समाज वास्तवातील हे चित्र बाळासाहेब सुधाकर शिंपी यांनी आपल्या “ जळंत्री “ या कथेतून मांडले आहे. सामाजिक भान जपणारा हा लेखक समाजातील वास्तवतेची निरिक्षणे आपल्या साहित्या व्दारे नोंदवत असतो. नाटकाकडे वळणारी ही कथा आणि कथेतील पात्रे ही मानवी समाजातील अनेक माणसं साकारतांना दिसतात. यात सुशिक्षित आणि अपुरे विज्ञानवादी देखिल सुटलेले नाहीत. लेखक बाळा जळगांवकरांची ही कथा आमच्या समाज मनाच्या डोळयावर बांधलेली पट्टी दूर करण्याचा प्रयत्न करण्यांबरोबरच डोळसवृत्ती जोपासण्याची जाणिव करुन देते. माणसांन माणसासोबत वागण्याच्या वेगवेगळया

त-हा स्वार्थाने आणि धर्मांधतेने समाजमनाला घातलेला विळखा यांतून सहीसलामत बाहेर पडण्यासाठी सांविधानिक मार्गाचा अवलंब करीत माणसानं सुखाच्या शोधासाठी आगोदर स्वार्थाचा त्याग करणे किती महत्वाचे आहे. हा विचार लेखकाच्या एकून विचारधारेतून चल होत जातो. माणूसकीची भावना आणि विचारच माणसाच्या विकासाचा मार्ग आहे. हा मार्ग अनुसरणारा प्रकाशाच्या वाटेवर सतत चालत राहून अनेकांना प्रकाशमानता प्रत्येकाच्या आयुष्यात येण्यासाठी अंधश्रध्दा, बुरसटलेले विचार नाकारणारी समाज व्यवस्था अस्तित्वात येण्याबरोबरच विज्ञानवादी विचारांची कास धरणारी माणसं आपल्या कुटूंबात ज्यावेळी विवेकाचा आणि विज्ञानाचा विचार रुजवतील त्यावेळी बाळासहेब शिंपी ( बाळा जळगांवकर ) यांची कथा निश्चितपणे समाजमनाला दिशा देणारी ठरेल.

त्यांच्या पुढील लेखन प्रवासास मन पूर्वक शुभेच्छा !

- श्री. प्रा. डॉं. मिलिंद विनायक बागुल,

कवी, लेखक तथा जिल्हाध्यक्ष सत्यशोधक साहित्य परीषद, जळगांव.

“ जळंत्री “ दिशाभूल करणाऱ्या लोकांची कहानी.

“ जळंत्री “

(सदर कथेतून अंधश्रध्दा पसरविण्याचा आमचा कोणताही उद्देश नाही. ही कथा केवळ मनोरंजनासाठी लिहिली असून याव्दारे मनोरंजनातून, प्रबोधन करणे हाच मुख्य उद्देश आहे.

“जळंत्री” ही कथा पुर्णपणे काल्पनिक असून यातील स्थळ, पात्र व त्यांची नावही काल्पनिक आहे याचा कुठल्याही जिवंत अथवा मृत व्यक्तीशी काहीएक संबंध नाही. असल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. सदर कथेतून कोणाच्च्याही भावना दुखावण्याचा आमचा उद्देश नसून, केवळ मनोरंजनासाठी ही कथा लिहीली गेली आहे.

# मनोगत



नमस्कार मित्रहो, तशी मला लेखनाची आवड लहानपणा-पासूनच, कविता, लेख लिहीणे हा माझा आवडता छंद माझ्या काही कविता व लेख वृत्तपत्रातही छापून आलेत. लेखनासाठी व्यासपीठ मिळावं म्हणून मी सकाळ वृत्तपत्रासाठी रिपोर्टर म्हणून तर महाराष्ट्र टाईम या वृत्तपत्रामध्ये कॉलेज क्लब रिपोर्टर म्हणून कॉलेजला असतांना काम केलं. माझं शिक्षण जेमतेम बी.ए पर्यंत झालं असून परिस्थीतीमुळे मला पुढे शिकता आलं नाही. काम करुन शिक्षण करणं हे मला परवडण्यासारखां नव्हतं. म्हणून मी पुढे शिकू शकलो नाही. काही दिवस मी एका स्थानिक न्युज चॅनलला उपसंपादक म्हणून काम केलं. तसेच मी स्वतःचे सा.वृत्तपत्र सूरु केलं. पण तेही बंद केलं. आपलंही एखाद पुस्तक प्रकाशित व्हावं व ते वाचकांपर्यंत पोहचावं अशी ईच्छा होती. पण पुस्तक प्रकाशित करण्यासाठी येणारा खर्च मला परवडण्यासारखा नव्हता. म्हणून मी बघितलेलं स्वप्न पुर्ण होईल की नाही? असा प्रश्न मनात होता. मला

"ई साहित्य प्रतिष्ठाण" विषयी माहिती मिळाली. व मी ई प्रतिष्ठाणच्या 'ई साहीत्य' वेबसाईटवरुन बरीच पुस्तके डाऊनलोड करून वाचली यात मुख्यत्वे कादंबऱ्या होत्या. या ई प्रतिष्ठानच्या अनोख्या उपक्रमामुळे मला लिहिण्याची प्रेरणा मिळाली व मी माझ्या मोबाईलमध्येच असलेल्या मायक्रोसॉफ्ट वर्डचा उपयोग करुन माझी लघूपट कथा

जळंत्री ही एक आठवड्यात लिहून पूर्ण करु शकलो. गेल्या काही दिवासांपासून कमी रक्तदाबाच्या त्रासाने मी त्रस्त आहे. माझ्यावर उपचार सुरु आहेत. मात्र अशा परिस्थितीत मी परमेश्वरकृपेने माझं हे दुसरं ईपुस्तकाचं लेखन पुर्ण करु शकलो. ई साहित्य प्रकाशनने हे पुस्तकप्रकाशित केल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान व ई साहित्य प्रकाशनचे मनापासून आभार! तसेच जळंत्री या कथेस ज्यांची प्रस्तावना लाभलीय असे. आदरनिय कवि, लेखक श्री. प्रा. डॉं. मिलिंद बागुल सर यांचेही मना पासून आभार सरां विषयी बोलायच झालं तर, न २००८ साली जळगांव शहरात मराठा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यांत आले होते. या साहित्य सांमेलनाचे सुत्र त्यावेळ मा. मिलिंदजी बागुल सरांकडे होते. त्यावेळी त्या साहित्य संमेलनात मला माझी पहिली कविता सादर करण्याची संधी मा. मिलिंदजी बागुल सरांनीदिली आणि ती कविता सादर केल्यावर प्रक्षकांकडून मिळालेला प्रतिसाद व त्या

साहित्य संमेलनात सुप्रसिध्द लेखक मा. पुरुषोत्तम खेडकर साहेब यांच्या हस्ते मला त्यावेळी गौरव करण्यायात आला होता. त्याचवेळी मा. मिलिंद सरांची प्रेरणा मिळाली. खऱ्याअर्थाने सरांनीच मला एवढ्या मोठ्या कार्यक्रमात मला कविता सादर करण्याची संधी दिली होती. आणि आज माझ्या सारख्या नवख्या तरुणाच्या पुस्तकाला मा. डॉ. मिलिंद बागुल सरांची प्रस्तावनापर शुभेच्छा लाभताय हे खर तर माझं भाग्य मी समजतो.

मला लेखन टाईपसेटींगसाठी ज्यांचे सहकार्य लाभले असे श्रीकांत निकुंभ सर यांचेही आभार ! माझं हे लेखन तुम्हांला आवडेल की नाही माहीत नाही? कारण मी काही लेखक नसून नवखा व्यक्ती आहे. आवडल्यास आपली प्रतिक्रिया नक्की कळवा.

आपला

बाळासाहेब सुधाकर शिंपी, मेहरुण परिसर,

जळगांव. ता. जि. जळगांव (खान्देश) पिन कोड – ४२५००१.

जळंत्री हा शब्द जवळपास सर्वांच्या परिचयांतीलच असा हा शब्द आहे. एखाद्याची प्रगती बघून कोणीतरी आपल्यांवर जळतो असं आपण नेहमीच म्हणत असतो. असाच काहीसा अर्थ ढोबळ मनाने वापरलेला “ जळंत्री “ या शब्दाचा होतो. कोणत्याही शब्दकोषात न सापडणारा जळंत्री हा शब्द जरी नविन वाटत असला तरी याचा सरळ अर्थ ‘ जळणारे ‘ असाच होतो. “ जळंत्री “ ही एक लघूपट कथा असून चित्रपट निर्मिती आथवा शॉर्टफिल्म निर्मितीची आवड असणाऱ्या माझ्या कला प्रेमीं मित्रांना हे पुस्तक नक्कीच लेखना बाबत मार्गदर्शक ठरेल अशी अपेक्षा करतो. सदर पुस्तक पटकथा कशी असावी? याचे उदाहरणा खातर लिहीली गेले आहे. सदर पुस्ततक हे शॉर्टफिल्म निर्मितीची आवड असणाऱ्या हौशी कलावंत, वाचक प्रेमी तसेच प्रत्येकवेळी मला साथ देणारे व माझ्या सुख दुखाःत सदैव माझ्या सोबत असणाऱ्या माझ्या आई वडीलांना “ जळंत्री” हे माझं दूसरं पुस्तक समर्पीत.

- बाळासाहेब सुधाकर शिंपी, मेहरुण, जळगाव.

ता.जि. जळगाव (महाराष्ट्र)

मो.नं. 9921729475

Email Id: balasaheb.siddesh@gmail.com

# जळंश्री

मराठी पटकथा

“ जळंत्री “

सिन नं. :- १

Efect Day

(सकाळची ७ वाजेची वेळ धनजी त्याच्या पत्नीला सांगतोय लवकर दोन भाकरी टाकं मी शेताकडं जावून येतोय.)

धनजीः- व्दारके ये व्दारके, अगं उरक पटकन मला शेताकडं जायचयं.

व्दारकाः- काय मेलं कटकटं तुमचं नेहमीचच... उरकं पटकन, उरकं ... तुम्हांला कुठं लग्नाला जायचय व्हय?

धनजीः- लग्नाला नाय, पण शेतात का तुझा बा जाणार?

व्दारकाः- तुमचं मेलं नेहमीचच, मला काय चार, चार हात आहेत इथं. पटकन आवर म्हणताय तर !

धनजीः- बरं बरं उरकं तू ! मी आलो तोवर म्हशीचं बेन देवून.

व्दारकाः- नुसतं बेनं देताय? तुम्हीच म्हटले होतेना बुधवारी बाजारातून डायरेक म्हैसचं घेऊन येणार म्हणून.

धनजीः- समदं खरयं तुझं पण पैशाचाही बजेट नाय का बघावा लागतं. पैसे हातात असते तर, आजच घेऊन आलो नसतो का? म्हणून आज फक्त बेनं देवून येतो. थोडे पैसे कमी पडताहेत. पैसे आल्यावर येऊ घरला म्हैस घेऊन.

व्दारकाः- म्हणजे असं झालं, डोक्यात खवले अनं, गुलालाची हौस. अशी गत झाली तुमची.

धनजीः- तू आली ‘ उधळ मानकी’ तुझ्या सारखं नाही आमच. समदं बघावं लागतं मला.

व्दारकाः- मग आता पैसे कुठून आणणारं?

धनजीः- बघतो थोडी उसनवारी करतो. मक्का विकल्यावर देऊ फेडून.

व्दारकाः- बाई बाई बाई... उगाच उधार ऊसनवारीच नांव काढू नका.

धनजीः- तुझं म्हणणं ठीक आहे. पण इथं काय झाडाला पैसे लागलेय? उधार उसनवारी करु नकं तर.

व्दारकाः- अहो उधार उसनवारी करायपेक्षा मी काय म्हणते, आपल्या शेतातील बांधावर असलेलं ते भलं मोठं बाभळीच झाडं हायना; ते कधी कामी येणार?

धनजीः- म्हणजी तू काय म्हणतेय? ते मला कळलंच नाय.

व्दारकाः- अहो म्हणजी ते बांधावरच झाड हायना; ते कापुन टाका आणि इकून टाका. आलेल्या पैशातून म्हैस घेऊन या.

धनजीः- अगं पण ते झाडं दोघांच्या भाव हिश्शाचं आहे. शरद काय म्हणेल?

व्दारकाः- अहो शरद भावजी काय म्हणणार? काट्याच झाडं, साऱ्यात ना पोता-यांत. काही उपयोगाचं तर नाय ना ते बाभूळाचं झाडं. म्हणून तोडतोय म्हणा.

धनजीः- बरं बघतो तेच करतो. तू भाकरी बांध लवकर... मी निघतो.

व्दारकाः- चला आताच जावूया ! मी पण येते तुमच्या संग...

धनजीः- बरं उरकं पटकन.

(धनजी कुऱ्हाड घेऊन शेताकडे निघतो. व्दारकाही त्याच्या सोबत असते.)

सिन नं. :- २

Efect Day

(धनजी व व्दारका शेतात पोहचतात. व बांधावर असलेल्या झाडांवर कुऱ्हाडीने वार करणार तितक्यांत शेतात काम करत असलेला धनजीचा भाऊ शरद व त्याची पत्नी उर्मिला बांधाकडे धावत जातात.)

उर्मिलाः- अहो धनी पाहिल व्हयं ! दादा ते झाडं कशापायी तोडताय?

शरदः- नाय गं तो कशाला तोडणार? उगीच काहीही बडबडू नको.

उर्मिलाः- अहो नीटं बघा समोरं... दोघं नवरा बायको झाड तोडायला निघालेत.

शरदः- थांब जावूनच बघतो तिकडं.

ऊर्मिलाः- थांबा मी पण येते.

(दोघं धनजीला झाडं तोडण्यासाठी मज्जाव करण्यासाठी बांधाकडं धावत जातात.)

सिन नं. :- ३

Effect Day

व्दारकाः- अहो धनी धनी, शरद भावजी आणि उर्मी दोघं इकडच येताय वाटतं?

धनजीः- अगं येऊदे त्याचा काय धाक आला आपल्याला.

शरदः- दादा, दादा थांब. अरे कशापायी हे झाड तोडाया निघाला?

धनजीः- कशापायी म्हणजे? तुझं काय जातय. मी तोडो नाही तर जाळो. तुला काय त्याच?

शरदः- माझं काय जातयं म्हणजे? हे बाभळाच झाड आपल्या शेताच्या बांधावर मग या झाडांवर आपल्या दोघांचा अधिकार.

धनजीः- असलं अधिकार ! पण म्या मोठा हाय. हे झाड बा आणि मी आम्ही दोघांनी लावलयं. त्यामुळे या झाडांवर माझा पहिला अधिकार आहे. तू कोण बोलणारा?

शरदः- मी कोण बोलणारा म्हणजी? बा तुझाबी अनं माझाबी... मग हे झाड आपलं दोघांच हाय.

व्दारकाः- असल दोघांच; तोडा हो धनी तुम्ही हे बाभळीच झाडं ! कोण काय करते बघताई मी.

उर्मिलाः- अहो ताई, कशाला उगाच या निरापराध झाडावर संताप काढताय? बरय बांधावर सावलीसाठी. “ झाडं “ आपल्याला प्राणवायू देतात.

व्दारकाः- अय चोमडे, उगाच चोमडेपणा करु नको. मोठी आली शहाणी; आम्हाला शहाणपणा शिकवायला.

धनजीः- व्दारके तू मागं सरक, मला कोण आडवत त्याला बघतोच.

(धनजी हातातील कुऱ्हाड घेत पुढे सरकतो.)

शरदः- दादा हे झाडं तोडण्याआधी मी उभाय; माझ्यावर तुला कुऱ्हाड चालवावी लागणार.

उर्मिलाः- भलेही आमच्यावर तुम्ही कुऱ्हाड चालवली ना, तरी आम्ही मागे हटणार नाही.

धनजीः- असं म्हणता व्हयं. मग बघतोच. कसे मागं हटत नाय ते? अयं...

व्दारकाः- हू... असं. आता कसे मागे हटणार नाही बघतेच.

उर्मिलाः- धनी...!

शरदः- उर्मी तू मांग सरकं; तू माझी चिंता करु नकोस.

उर्मिलाः- नाय धनी मी तुम्हाला एकटं नाही सोडणार !

(धनजीने तावातावात कुऱ्हाड उगारली... दोघं प्रतिकार करताय. तितक्यात समोरुन विज्या आणि पंडीतराव येतात.)

विज्याः- आरं सोडा, सोडा. उगाच कशाला भांडताय?

पंडीतरावः- आरं सख्खे भाऊना तुम्ही? मग एकमेकांच्या जीवावर उठलेय.

विज्याः- सोडा, सोडा उगाच भांडू नका.

पंडीतरावः- धनजी तू मोठा भाऊ आहेसना शरदचा? मग असं भांडतात व्हय. कमी जास्त झालं म्हणजी.

धनजीः- बघतोच याची. कसाकाय झाड तोडू देत नाय तर मला?

विज्याः- आरं एका झाडा पायी भावाभावाच्या जीवावर उठता होय.

पंडीतरावः- अरे एकच झाडं बांधावर ! असं कशापायी तोडाया निघाला? तात्याची आठवण हाय ती. तुझ्याबानं लावलय ते झाडं !

धनजीः- लावलं असंल, पण काय उपयोग त्या झाडाचा? समदे काटेच काटे त्या बाभळीवर.

पंडीतरावः- अरं काट्याच असंल म्हणून काय झालं? थंडी सावली तर देतय ना उन्हात.

विज्याः- असं भांडू नका सोबत्यांनो. एकच झाडं तेवढं तरी राहु द्या बांधावर.

पंडीतरावः- व्हय ना... आधी कसं हिरवळीनं नटलेलं गांव होतं आपलं... असंच एकएक झाडं तोडून लोकांनी भकास रान करुन टाकलं. असं करु नका लेकांनो. आता यांपुढे भांडण करु नका. गुमानं घरी जा आपापल्या.

विज्याः- धनजी तू पण जा घरला. शरद तू पण... आणि वहिनी जा या दोघांना घरी घेऊन तुम्हीबी.

(धनजी, शरद, व्दारका आणि उर्मिला आपापल्या घरांकडे जातात. तर पंडीतराव व विज्या दोघं चर्चा करतात.)

पंडीतरावः- कायं रं विज्या, या धन्याच्या तोंडावरची कधी माशी उडत नाय. अनं आज दोघं भावांमध्ये कशावरुन बिनसलं? जे एकमेकांच्या जीवावर उठलेत.

विज्याः- पंडीतराव तुम्हाला नाय कळायचं. हे समदं धनजीच्या बायकोमुळे झालं असणार ! तीच कैदासिन आहे त्यांच्या घरांत, धनजी बिचारा साधा भोळा. पण तिचं ऐकूनच त्याने हे केलं असणार?

पंडीतरावः- पण कधी न झगडणारे भाऊ या थड्याला जातील. असं वाटलं नव्हतं.

विज्याः- जावूदे आपल्याला काय त्याचं? हीच आपल्यासाठी खरी संधी आहे. धनजीबी तसा लई कंजूस म्हणा, उसने पैसे मागितले तर कधी वगळत नाही. मग त्याला असाच धडा शिकवावा लागेल. म्हणजे दोघं भावांमध्ये फुट पडून ते जमिनी विकायला काढतील. आणि फायदा आपलाच.

पंडीतरावः- व्वा विज्या ! लईभारी डोकं चालवतोस लेका तू शाब्बास ! मानावं लागल तुला.

विज्याः- पंडीतराव चला निघूया आपण.

(दोघ निघून जातात.)

सिनं नं. ४

Efect Day

(धनजी आणि त्याची बायको घरी पोचतात. तितक्यांत मार्केट मधून धान्य व्यापाऱ्याचा फोन येतो.)

धनजीः- हॅलो कोण?

धान्य व्यापारीः- मी मदनलाल बोलतोय. (in Phone.)

धनजीः- बोला शेठं, काय म्हणता?

धान्य व्यापारीः- धनजी, तू मक्का मार्केटला आणला होता ना त्याचा आत्ताच लिलाव झाला. २५०० चा भाव मिळाला तुझ्या मक्क्याला. ऑफीसला येऊन तुझं पेमेंट घेऊन जा. (in Phone.)

धनजीः- लई बरं झालं शेठजी. म्या लगेच येतो ऑफीसवर पेमेंट घ्यायला.

(धनजी फोन ठेवतो.)

व्दारकाः- काय झालं हो धनी?

धनजीः- अगं व्दारके, आपण मार्केटमध्ये विक्रीला नेलेल्या मक्क्याचा आज लिलाव झाला. २५०० चा भाव मिळाला

मक्क्याला. समदी देवाचीच किरपा झाली बघ. मी आता शेठजीकडे जावून येतो आणि आपले पैसे घेऊन येतो बघ.

व्दारकाः- सांभाळून जा हा धनी आणि पैसे मिळाल्यावर म्हैसच विकत घेऊन या आज.

धनजीः- व्हय व्हय तसंच करतो.

(धनजी मक्क्याचे पैसे घेण्यासाठी मदनलाल शेठच्या ऑफीसकडे निघतो.)

सिन नं. ५

Efect Day

(मदनलाल ऑफिसांत बसलाय. बाहेर त्याचा मुनिमजी बसलाय. तितक्यांत धनजी तेथे पोहचतो.)

धनजीः- शेठजी आहेत का?

मुनिमजीः- हो आहेत. तुम्ही थोडं थांबा. मध्ये कोणीतरी बसलंय. त्यांच्याशी बोलताय शेठजी.

(धनजी थोडावेळ बाहेर बसतो. मुनिमजी आत जातो. व शेठजींना धनजी आल्याचे सांगतो.)

मुनिमजीः- शेठजी धनजी आलायं.

धान्यव्यापारीः- पाठव त्याला आत.

मुनिमजीः- जी शेठजी, पाठवतो त्याला आत.

(मुनिमजी कॅबिनमधून बाहेर येत.)

धनजी भाऊ, शेठनी बोलीवलं तुम्हांला आत.

(धनजी कॅबिनमध्ये जातो.)

धान्यव्यापारीः- ये ये धना... अरं तिथं कशाला बसतोयेस? इथं खुर्चीवर बैस.

धनजीः- नाय, नाय शेठजी; बराय मी इथंच.

धान्य व्यापारीः- अरे बैस खुर्चीवर ! लाजतोय कशाला?

एक व्यक्तीः- अरे बैस धनजी शेठ म्हणताहेत तर.

(धनजी खुर्चीवर बसतो.)

धान्यव्यापारीः- मुनिमजी चहा सांगा बघू.

मुनिमजीः- होय शेठजी सांगतो. बाळू जा आणि चहा घेऊन ये बरं.

बाळूः- होय आणतो काका.

धान्यव्यापारीः- मुनीमजी धनजीचा हिशोबाच्या पावत्या घेऊन यां आणि किती पेमेंट होतंय ते सांगा.

मुनीमजीः- जी शेठजी.

(तितक्यांत बाळू चहा घेऊन येतो. व सर्वांना देतो.)

धान्यव्यापारीः- सर घ्या चहा... धनजी तू पण घे...

(सर्वजण चहा पितात.)

मुनिमजी झाला का हिशोब?

मुनिमजीः- होय शेठजी.

धान्यव्यापारीः- किती झालंय धनजीचं पेमेंट?

मुनिमजीः- ३० क्विंटल झाला मका... २५०० x 30 = ७५०००/- रुपये होतात. त्यापैकी आडत कमिशन ३००० व हमाली व ट्रान्सपोर्ट खर्च २००० असे एकत्रीत पाचहजार रुपये

वजा करुन ७० हजार रुपये पेमेंट होतय शेठजी धनजी भाऊचं.

धान्य व्यापारीः- धनजी ७० हजार पेमेंट झालय... हे घे पैसे मोजून घे. आणि हो पुढच्या वेळला मक्का, ज्वारी किंवा भुईमुंग काहीबी असो आपल्यालाच दे हं... दूसऱ्याला देवू नकोस. चांगलाच भाव मिळवून देईल तुला.

धनजीः- जी शेठजी. तुम्हालाच देणार ! यांपुढे कोणतही पिक आल्यावर.

मुनिमजीः- धनजी भाऊ इथं सही करा.

(धनजी मुनीमजीने सांगितल्याप्रमाणे रजिस्टरवर सही करतो. व पैसे घेऊन घराकडे निघतो.)

धनजीः- येतो शेठजी. धन्यवाद !

धान्यव्यापारीः- हो ये धनजी.

सिन नं. ६

Efect Evening

(व्दारका घरांत स्वयंपाक करतेय तितक्यांत धनजी नवी म्हैस विकत घेऊन घरी जातो. धनजीचा मुलगा गण्या मुलांमध्ये खेळत असतो.)

धनजीः- गण्या अय गण्या, तुझ्या आईला बोलीव लवकर पुजेच ताट घेऊन.

गण्याः- होय होय आबा... आई ये आई, बानं नवी म्हैस आणली बाजारातून... तुला आरतीच ताटं घेऊन बोलवलं.

व्दारकाः- होयं आणती, आणती म्हणा.

(धनजीने म्हैस आणल्यावर बाजूलाच राहत असलेला त्याचा भाऊ शरदला व त्याची पत्नी उर्मिलाला हे कळत ते दोघं त्यांच्या ओट्यावरुनच बघत असतात.)

उर्मिलाः- अहो दादाने म्हैस विकत आणली वाटतं?

शरदः- बरं झालं अशीच प्रगती होत राहो दादाची आणि त्याच्या मागे आपलीही.

उर्मिलाः- होय खरयं तुमचं.

(इकडे व्दारका म्हशीची पुजा करते. पुजा करत असतांना तिच लक्ष ओट्यांवर उभ्या असलेल्या उर्मिला व शरद कडे जाते व ती त्यांच्याकडे बघून मुद्दाम जोरात बोलते.)

व्दारकाः- बघितलं धनी? आपण नवी म्हैस आणली तर लोकांची जळंत्री व्हाया लागलीय.

आपल्या सोन्या सारख्या म्हशीला कोणाची दृष्ट न लागोरे देवा. थांबा थांबा मी दृष्ट काढते तिची.

रामभाऊः- काय धनजी, नवी म्हैस आणली वाटतं?

धनजीः- होय राम भाऊ... कशीय?

रामभाऊः- चांगलीय.

(तितक्यांत तिकडून विज्या येतो.)

धनजीः- आरं ये विज्या, अरं इकडं ये की, ही बघ आपण नवी म्हैस आणलीय.

विज्याः- काय रे धन्या, म्हैस आणायला पैसे कुठून आले? आणि तू म्हैस विकत आणणारं हे मला कधी सांगितलंही नाही.

धनजीः- अरे तसं नाय समद अचानक ठरलं मका विकला आणि आलेल्या पैशातून म्हैस घेतली.

विज्याः- बरं झालं. पण एक शब्द तर सांगायचा ना... मित्र न मी तुझा?

धनजीः- विसरलोच मी तुला सांगायच.

विज्याः बरं जावूदे... वहिनी आता फस्टक्लास चहा पाजा बघू म्हैस आणली म्हणून.

धनजीः- व्दारके, चहा ठेव बघू सर्वांसाठी.

व्दारकाः- पण दूध नाहीये चहासाठी.

विज्याः- काय वहिनी तुम्हीबी एवढी म्हैस कशासाठी आणली आपण? धनजी काढ या म्हशीचं दूध.

व्दारकाः- व्हय धनी विजू भावजी बरोबर सांगताय. या म्हशीचं दूध काढा. म्हणजे सर्वांसाठी चहा पण होईल आणि नवी म्हैस दूध किती देते याचाही अंदाज समजेल.

धनजीः- व्हय, बरोबर सांगतेय तू... गण्या एक बादली आणं घरांतून.

गण्याः- आणतो आबा ! ही घ्या आबा बादली.)

(गण्या घरातून बादली आणतो. आणि धनजी म्हशीच दूध काढतो.)

विज्याः- अर धन्या उरकं पटकन... किती दूध काढणार?

धनजीः- अरं झालं झालं.

रामभाऊः- धना म्हैस जातीवान दिसतेय. चांगलं दूध देतेय.

विज्याः- बापरे एवढं दूध दिलं या म्हशीनं? कमाल आहे. १०, १५ लिटर दूध देणारी म्हैस आणली तू, आता वांधा नाही धन्या तुला.

व्दारकाः- भाऊजी नजर लागून जाईल तुमची आमच्या म्हशीला.

विज्याः- वहिनी नजर लागून जाईल दोरा बांधा तिच्या पायांत.

व्दारकाः- होय तेच करते.

तुकारामः- धनजी म्हैस घेतली का?

धनजीः- होय काका...

शामरावः- चांगली दुभती म्हैस आणली म्हणावं. चांगलच दूध देते ही म्हैस. आता चहा कधी पाजणार?

(धनजीने म्हशीच बादलीभर दूध काढल्यावर सर्वांचेच डोळे विस्फारतात.)

धनजीः- (आनंदाने बोलतो.) व्हय मंग.

व्दारके चहा ठेव सर्वांसाठी.

व्दारकाः- व्हय, व्हय ठेवते ठेवते.

(व्दारका सर्वांसाठी चहा ठेवते. व चहा घेऊन येते सर्वजण चहा पितात व आपापल्या घरी जातात.)

सिन नं. ७

Efect Day

(सकाळ झालीय धनजी म्हशीला चारा घेऊनदूध काढायला जातो. म्हैस घराजवळ असलेल्या गोठ्यातच बांधलेली असते.)

धनजीः- हय हय... चांदनी. काय झालं हिला? दूधच देत नाय ही.

व्दारकाः- काहो धनी... किती दूध दिल आज म्हशीनी?

धनजीः- व्दारके... व्दारके... अगं आज काय झालं कुणास ठाऊक म्हशीला? दूधच देत नाहीये...

व्दारकाः- अहो धनी नविन नविन आहे म्हणून दूध देत नसणार देईल देईल ती.

धनजीः- व्दारके देतच नाय ही चांदणी दूध.

व्दारकाः- बई, बई बई बई... काय नशिब फुटकं मेलं. एवढे पैसे खर्चून म्हैस आणली पण गेले बाई पैसे पाण्यात. ही म्हैस दूध पण देईना. धनी मला वाटतं आपल्या नव्या म्हशीला त्या शरदभावजीची आणि उर्मीचीच नजर लागली असणार !

धनजीः- व्दारके अगं काय बोलतेय तू? माझा भाऊ शरद आणि उर्मिला नाय गं तसे.

व्दारकाः- आ हा हा... लई भरवसा तुमचा तुमच्या भाऊ भावजाईवर हू...

(व्दारका नाक मुरडत निघून जाते.)

धनजीः- अगं व्दारके ऐक तर खरं...

व्दारकाः- या म्हशीला त्या कैदासीननेच काही केलं असणार... बघतेच तिला मी.

(मनाशी पुटपुटत व्दारका तेथून निघून जाते.)

सिन नं. ८

Efect Night

(रात्रीचीवेळ धनजी पुन्हा गोठ्यात दूध काढायला जातो. पण म्हैस काही दूधच देत नाही म्हणून तो खाली हात परततो.)

व्दारका:- दिलं का हो धनी म्हशीने दूध?

धनजी:- नाही गं... काय झालं असणार असं अचानक आपल्या म्हशीला देव जाणे?

व्दारका:- त्या मेल्यांनीच आपल्या म्हशीला काहीतरी केलं आसणार. मला खात्री आहे.

(तितक्यांत विजय येतो.)

विज्या:- काय धनजी आणि वहिनी काय सल्ला चालूय दोघांमध्ये?

धनजी:- आरं विज्या कसला सल्ला...

विज्या:- मगं झालं तरी काय? टेंशन मध्ये दिसताय तुम्ही दोघं काय बात आहे?

धनजी:- अरे कालच म्हैस आणली. काल आणल्यावर बरोबर दूध दिलं तिने पण आज सकाळी आणि आता थेंबभर सुध्दा दूध दिलं नाही तीने. काय झालं कुणास ठाऊक तिला?

व्दारकाः- भावजी मला तरी वाटतं या म्हशीला कुणाची तरी नजर लागली असणार? नाहीतर कोणीतरी सूडबुध्दीने आमच्या म्हशीला काही तरी केलं असणार !

विज्याः- धनजी वहिनी बरोबर सांगताहेत. मलाही तसच वाटतयं. एवढी एकावेळेला १० – १५ लिटर दूध देणारी म्हैस आशी अचानक दूध न देणं म्हणजे हे कोणी तरी केलेले अघोरी कृत्यच म्हणता येईल.

धनजीः- कोण करणार असं? आपण कधी कुणाचं वाईटच केलं नाही. मग आपलं कशाला कोणी वाईट करणार?

विज्याः- धनजी, असं म्हणूच नको. आजकाल सख्खा भाऊही भावाच वाईट चिंतू शकतो.

धनजीः- नाही, नाही माझा भाऊ शरद तसा नाय तो कशाला माझं वाईट चिंतणार?

व्दारकाः- भावजी यांना यांच्या भावावर लई भरवसा.

विज्याः- धनजी हे कृत्य शरदने नाही पण त्याच्या बायकोने केलं असणार तर काय भरवसासा? पण तू काळजी करु नकोस मी तुला माझ्या ओळखीच्या एका बाबाकडे घेऊन जाईल तो समदं सांगेल आपल्याला.

धनजीः- बरं आपण पहाटेलाच जाऊया तिथं.

विज्याः- चल येतो मी उद्या नक्की जावूयांत आपण.

(असं म्हणतं विज्या निघून जातो. व धनजी आणि व्दारका काहीसे नाराज मुडमध्ये घराकडे जातात.)

सिन नं. ९

Efect Day

(एका घरामध्ये एक मांत्रिक बसलेला असतो. त्याच्या जवळ काही लोक आपापली गुढी विचारण्यासाठी येऊन बसलेले असतात.)

मांत्रिकः- बोल बेटा, तुझी काय समस्या आहे?

एक व्यक्तीः- बाबा, माझा मुलगा लयी हुशार पण त्याला नोकरीच लागत नाही.

मांत्रिकः- डिगी डिगी डिगी डिगी... डीगी डीगी डीगी डीगी...

भगत निंबू आणलाय का? आंड आणलय का?

एक व्यक्तीः- आणलंय बाबा.

मांत्रिकः- घोर... अति घोर... या बालकाला कुणी जादूटोना केलाय.

ती शक्ती याच्यातून काढावी लागेल.

एक व्यक्तीः- काय करावं लागेल बाबा यासाठी?

मांत्रिकः- यासाठी त्याला मी एक धागा देतो.

(तो मांत्रिक तो धागा तयार करतो.)

भुत बांध चुरड बांध, बांध, बांध चिंचेला बांध,

आंब्याला बांध याला बांध त्याला बांध... बांध,बांध, बांध.

हा धागा त्याच्या गळयांत बांधा.

एकव्यक्तीः- चालेल बाबा.

मांत्रिकः- पुढच्या येळी येतांना १५१ लिंब, अंडे घेऊन या याची पूजा करावी लागेल याची शांती पूजा करावी लागेल. त्यासाठी ५ हजार रुपये खर्च येईल.

एकव्यक्तीः- चालेल बाबा येतो आम्ही.

मांत्रिकः- बोला तुमचा काय सवाल आहे?

विज्याः- बाबा या धनजीने दोन दिवसांपूर्वीच म्हैस विकत आणली. पहिल्या दिवशी म्हशीने १० ते १५ लिटर दूध दिलं पण नंतर म्हशीने दूधच दिलं नाही.

धनजीः- व्हय बाबा, काय झालं कुणास ठाऊक? ती म्हैस दूधच देईना.

मांत्रिकः- निंबू, अंड आणलयं का?

धनजीः- नाही बाबा.

मांत्रिकः- असूदे मी देतो. त्याचे १५१ रुपये लागतील.

धनजीः- चालेल बाबा.

मांत्रिकः- भुत बांध चुरड बांध, बांध, बांध चिंचेला बांध,

आंब्याला बांध याला बांध त्याला बांध... बांध, बांध, बांध.

घोर अघोर... घोर...अघोर... बालक तुझ्या दुभत्या म्हशीला कोणी तरी करणी केलीय. त्याच्यामुळे ती दूध देत नाही.

धनजीः- बाबा यावर काही उपायं?

मांत्रिकः- यांवर उपाय आहे बालक काळजी करु नकोस. मी आता एक गंडा देतो तो तू त्या म्हशीच्या पायाला बांध व हा लिंबू उतरवून तीन रस्त्याला फेकून ते. मग देईल ती दूध. नाहीच दिलं तर तूला एक पूजा करावी लागेल.

विज्याः- चालेल बाबा.

मांत्रिकः- याला तुला १० हजार रुपये खर्च येईल.

धनजीः- चालेल बाबा. येतो आम्ही आता.

मांत्रिकः- या आता.

(धनजी व विज्या दोघंही मोटार सायकलीने घराकडे जातात.)

विज्याः- धन्या बाबाने सांगितल्या प्रमाणे कर समदं ठीक होईल.

धनजीः- समदं तसंच करतो.

सिन नं. १०

Efect Day

(मांत्रिकाने सांगितल्या प्रमाणे धनजी तो धागा म्हशीच्या पायाला बांधतो व निंबू तीन रस्त्यावर फेकून देतो.)

धनजीः- झालं बाबाने सांगितल्या प्रमाणे केलं समदं... आता देईल नारे म्हैस दूध?

विज्याः- व्हय रं देईल आता तु काळजी करु नकोस. पण मी बोललो होतोना तुला की तूझ्या म्हशीला कोणीतरी काहीतरी केलं असणारं? तेच सांगितलं बाबानं... मला तर तुझ्या भावाचाच संशय येतोय.

धनजीः- कोणीबी असो, नाव कळल तर दाखवेन त्याला इंगा.

विज्याः- बरं येतो म्या.

धनजीः- बरं ये विज्या... म्या पण शेतात जातोय.

विज्याः- समदा प्लॅन सक्सेस ! १० हजार धन्याने मांत्रिकाला दिल्यावर आपल्यालाही ५ हजार भेटतीलच.

(विज्या मनाशी पुटपूटतं निघून जातो.)

सिन नं. ११

Efect Day

(धनजीची पत्नी व्दारका ओट्यावर बसून दळणं निवडतेय. तर गण्या पुस्तक वाचतोय. तितक्यांत धनजी घरी पोहचतो.)

व्दारकाः- धनी अहो धनी आले व्हयं? आले व्हय. काय सांगितलं बाबांनी?

धनजीः- सांगतो, सांगतो... गण्या पाणी आण बघू.

व्दारकाः- गण्या तुझ्या आबाला पाणी आण बघू प्यायला.

गण्याः- आई तु पण काय. मी अभ्यास करतोय दिसत नाय व्हय तुला?

व्दारकाः- उठं जा आधी.

गण्याः- जातो, जातो.

व्दारकाः- धनी काय सांगितलं व्हं बाबाने?

धनजीः- कोणी तरी करणी केलीय म्हणे म्हशिला !

व्दारकाः- बई, बई बई बई कोणत्या चांडाळाला सहन झाली नाही, एवढं दूध देणारी म्हैस.

गण्याः- आबा हे घ्या पाणी.

(गण्याने आणलेलं पाणी धनजी पितो.)

धनजीः- ज्याची करणी त्याच्या संगे समद ठीक होईल असं बोलले ते महाराज.

व्दारकाः- समदं ठिक होऊ देरं देवा. मला तर त्या शरद्यावर आणि त्या उर्मी सटवेवरच शंका जातेय.

धनजीः- तो कशाला करेल तसा?

व्दारकाः- तुम्हाला त्याच्यावर लई भरवसा. हू...

धनजीः- बरं मी येतो शेताकडं जावून !

व्दारकाः- बरं या... संध्याकाळी लवकर या परत म्हशीच दूध काढायला.

धनजीः- व्हय, व्हय.

सिन नं. १२A.

Efect Night

(धनजी शेतातून घरी येतो. यायला थोडा उशीर होतो मग धनजी बाहेरच्या बाहेर अंगणातून त्याच्या पत्नीला आवाज देतो.)

धनजीः- व्दारके ये व्दारके, आगं गण्याला बादली घेऊन पाठव की.
आधीच उशीर झालाय? म्हैशीच दूध काढायला जायला.

व्दारकाः- थांबा मीच आणते बादली आणि पाणी.

धनजीः- अनं गण्या कुठं गेला?

व्दारकाः- तो गेला कुठं पोरांमधी खेळायला.

धनजीः- बरं जावूदे तू चल पटकन.

व्दारकाः- हो आले आले...

(धनजी आणि व्दारका दोघं म्हशीच दूध काढायला जातात.)

व्दारकाः- काहो धनी आता तरी देईल ना आपली म्हैस दूध?

धनजीः- अ गं का नाही देणार ती म्हैस दूध? बाबाने तो धागा काय असाच दिला व्हय. म्हैस दूध देणार म्हणजे देणार !

(धनजी व त्याची पत्नी गोठ्याजवळ पोहचतात. व धनजी म्हशीच दूध काढायला बसतो.)

धनजीः- हय चांदणी... हे बघं म्यातुझ्यासाठी हिरवागार चारा आणला हा खा... आणि गुमानं दूध दे आज.

(धनजी खूप प्रयत्न करतो पण म्हैस काही दूधच देत नाही. त्याची पत्नी त्याला विचारते.)

व्दारकाः- काय हो धनी दिलं का दूध म्हशीने?

धनजीः- नाय गं काहीच उपयोग झाला नाही. त्या बाबाकडे जावूनबी एक थेंब सुध्दा दूध दिलं नाही म्हशीनं. मला वाटतं बाबाने सांगितल्या प्रमाणेच पूजा करावी लागेल. तेंव्हाच कुठे दूध देणार ही म्हैस.

(धनजी आणि त्याची पत्नी बोलत असतांनाच त्याचा लहान भाऊ शरद तिकडून येत असतो. म्हैस दूध देत नाही हे शब्द त्याच्या कानी पडतात आणि तो त्याच्या भावाला म्हणजे धनजीला विचारतो.)

शरदः- काय दादा म्हैस दूध देत नाही का?

धनजीः- तुझ्या तर... तुला काय रे त्याचं? म्हैस आमचीय ती दूध देवो अथवा नाही तुझं काय जातं? तुच काहीतरी केलय आमच्या म्हशीला म्हणूनच ती दूध देत नाही.

(धनजी त्याच्या लहान भावाला संतापात बोलतो.)

शरदः- दादा माझ्या मुळं कशाला? आणि मी काय करणार तुझ्या म्हशीला.

व्दारकाः- आम्ही म्हैस आणली म्हणून तुमची जळंत्री झाली. तुम्ही आणि त्या उर्मी सटवेनच आमच्या म्हशीला करणी केलीय.

शरदः- वहिनी तोंड सांभाळून बोला. नाहीतर?

व्दारकाः- नाहीतर काय... मारणार आम्हाला?

धनजीः- तुझ्या तर... चोर तर चोर वर शिरजोर...

(धनजी शरदची कॉलर पकडतो दोघांमध्ये तुफान भांडणे होतात. संतापात धनजी एक भला मोठा दगड शरदला मारायला उचलतो.)

शरदः- दादा काही तरी गैरसमज होतोय तुला. मी का असं करणार? तुझी म्हैस अनं माझी म्हैस काय परकी होय. मी का अस करणार?

धनजीः- तू का असं करणार थांब बघतोच तुला.

शरदः- दादा ऐक माझं, दादा ऐक माझं मला मारु नको... मी तुझ्या पाया पडतो.

(धनजी शरदच्या डोक्यांत दगड घालणार तितक्यांत शरद त्याला जोराचा धक्का मारुन तेथून पळ काढतो. धनजीच्या हातातील दगड खाली पडतो. व धनजीचा तोल जाऊन तो त्या दगडांवर जावून कोसळतो.)

व्दारकाः- अहो वाचवा... वाचवा... माझ्या धनीला या शरद्यानं मारलं...

(व्दारका आरडा ओरड करते.)

सिन नं. १३

Efect Night

(विज्या पंडीतराव व अन्य तीन जण काही अंतरावरच जुगार खेळताहेत त्यांच्या कानावर व्दारकेचा रडण्याचा आवाज येतो व ते धनजीच्या गोठ्याकडे धावत जातात.)

पंडीतरावः- ही घे दुरी...

विज्याः- राजा तू घे गुलाम...

परभ्याः- अरे विज्या काही तरी झालं वाटतं? कोणी तरी रडतयं.

पंडीतरावः- अरे खेळा गुपचूप आपलं कायं जातंय.

विज्याः- पंडीतराव हा आवाज धन्याच्या बायकोचाच वाटतोय.

पंडीतरावः- धन्यानं त्याच्या बायकोला मारलं वाटतं?

विज्याः- चला जावून बघूया...

परभ्याः- व्हय चला चला...

(सर्वजण गोठ्याच्या दिशेनं धावत जातात.)

सिन नं. १२ B.

Efect Night

(व्दारका धनजी जवळ रडत बसलीय. तितक्यांत विज्या, पंडीतराव, परभ्या व अन्य दोनजण तेथे पोहचतात.)

विज्याः- वहिनी ओ वहिनी काय झालं रडाया...

व्दारकाः- काय सांगू भावजी त्या शरद्यानं तुमच्या भावाला इतकं मारलं, इतकं मारलं तर त्यांना या दगडावरच ढकलून दिलं. बघा त्यांची अवस्था काय झाली.

विज्याः- धनजी... अरे उठं अरं काय झालं तुला?

पंडितरावः- विज्या हा बेशुध्द झालाय. आणि याच्या डोक्यालाही मार लागलाय. रक्तही निघतयं. याला लवकर डॉंक्टरांकडे घेऊन जायला हवं.

विज्याः- परभ्या तू जा पटकनं एक ग्लास पाणी घेऊन ये आधी...

(परभ्या धावतच पाणी घ्यायला जातो.)

वहिनी आधीच सांगत होतो. शरद चांगला नाही आणि त्याची बायकोही; पण धन्या काही ऐकतच नाही. तुमची प्रगती बघून ते सारखेच जळत असतात म्हणूनच सुड बुध्दीने तो धन्याला मारायला निघाला.

व्दारकाः- व्हय भाऊजी खरं सांगताय तुम्ही. आज हे सर्व त्याच्यामुळच घडलं.

परभ्याः- हा हे घे विज्या पाणी.

विज्याः- (पाण्याचा ग्लास घेऊन धनजीच्या तोंडावर शिंपडतो.)

धन्या, उठं... अरं उठं धन्या...

धन्याः- कोण? आ... आई गं...

(तोंडावर पाणी मारल्याने धनजी शुध्दीवर येतो. पण डोक्याला मार लागला असल्यामुळे डोक्यातून रक्तस्राव होत राहतो.)

पंडीतरावः- वहिनी चला पटकन याला डॉंक्टरांकडे न्यायला हवं.

परभ्या जा पटकन गाडी काढं.

परभ्याः- व्हय व्हय...

विज्याः- बसवा पटकनं याला गाडीवर... वहिनी बसा तुम्ही पण गाडीत या धनजीला दवाखान्यात घेऊन जावूया ...

व्दारकाः- व्हय भावजी चला पटकन.

(धनजीला गाडीत बसवून दवाखान्यांत घेऊन जातात.)

सिन नं. १४

Efcet Night

(धनजी दवाखान्यांत बेडवर पडलाय. व डॉंक्टरांनी चेक करुन त्याला घरी सोडण्याचा निर्णय घेतलाय.)

डॉंक्टरः- धनजी आता तुम्ही पुर्ण ठणठणीत झाला आहात.

व्दारकाः- डॉंक्टर साहेब घाबरण्या सारखं काही नाही ना?

डॉंक्टरः- वहिनी काळजी करण्याच काही कारण नाही. डोक्याला थोडा मार लागलाय.

तिथं ड्रेसिंग केलीय. फक्त थोडे दिवस आराम करा धनजी आणि औषध वेळेवर घ्या म्हणजे लवकर बर वाटेल.

व्दारकाः- डॉंक्टर तुमचे किती आभार मानावे हेच कळत नाही.

धन्यवाद डॉंक्टर... हे अशा अवस्थेत पडले होते. काहीवेळ ते शुध्दीवरच नव्हते. पण खरंतर तुमच्यामुळे आज यांना जीवनदान मिळालं. लई उपकार झाले बघा तुमचे.

डॉंक्टरः- माझे कसले आभार? हे तर माझं कर्तव्यच.

विज्याः- वहिनी, मी पोलिसांना फोन केलाय ते येतीलच चौकशीसाठी.

व्दारकाः- बरं केलं भावजी आता तो शरद्या तिथं पोलिस स्टेशनमध्येच सरळ होईल.

धनजीः- पण याची काय गरज होती?

व्दारकाः- तुम्ही शांत बसा. त्या शिवाय तो ठीकाणावर येणार नाही.

विज्याः- धन्या पोलिसांनी विचारलं तर समदं खरंखरं सांग.

धनजीः- अरे पण का? त्याची काहीच चूक नाही. चूक माझीच होती.

व्दारकाः- शांत बसा विजय भावजी बरोबर सांगताय. त्यांच ऐका जरा. तरच त्या शरद्याला अद्दल घडेल.

(तितक्यांत पोलिस पोहचतात.)

पोलिसः- धनजी पाटील तुम्हीच का?

व्दारकाः- होय हेच.

हवालदार १:- कोणी फोन केला होता?

विज्याः- म्या केला होता साहेब फोन.

हवालदार १:- तुम्ही कोण यांचे?

विज्याः- साहेब मी मित्र या धनजीचा.

हवालदार १:- बरं कसं काय झालं हे?

व्दारकाः- काय सांगू साहेब यांच्या सख्या भावान म्हणजे शरदनं यांना जोरदार मारहाण केली,. त्यामुळे हे पुर्ण रक्तबंबाळ झाले. किती वेळ तर हे बेशुध्दच होते.

इन्स्पेक्टरः- तुम्ही यांच्या पत्नी का?

व्दारकाः- व्हय साहेब मी यांची पत्नी.

इन्स्पेक्टरः- हे सगळं घडलं तेंव्हा तुम्ही कुठे होतात?

व्दारकाः- मी पण तिथच होते साहेब मी जर आरडाओरडा केला नसता तर त्याने आम्हा दोघांना संपवला असतं.

इन्स्पेक्टरः- धनजी कशावरुन घडलं हे सर्व?

धनजीः- साहेब मी नवी म्हैस आणली तर ती दूधच देईना... त्या म्हशीला माझ्या भावानेच काही केल आसणारं? म्हणून मी त्याला जाब विचारायला गेलो तर त्याने सरळ मारहाणच केली मला.

इन्स्पेक्टरः- म्हशीला काही केलं म्हणजे?

व्दारकाः- म्हणजे करणी केली साहेब त्याने करणी.

इन्स्पेक्टरः- हे बघा या सर्व अंधगोष्टी आहेत अस काही नसतं यांवर तुम्ही लोक कशाला विश्वास ठेवतात. आणि हे तुम्हाला कसं कळलं त्यानेच करणी केली म्हणून?

व्दारका:- एका मांत्रिकाने सांगितल आम्हाला तसं. हे विजय भावजीच घेऊन गेले होते यांना त्या मांत्रिकांकडे.

इन्स्पेक्टर:- बरं बघतो मी काय ते?

हवालदार सर्वांचे जबाब आपण नोंदवलेच आहेत दोघांच्या सह्या घ्या आणि साक्षिदारमध्ये या सर्वांची नांव टाकून त्यांच्याही सह्या घ्या.

हवालदार:- जी साहेब.

इन्स्पेक्टर:- आणि हो चौकशीसाठी धनजीचा भाऊ शरदला ताब्यात घ्या.

हवालदार:- जी साहेब.

इन्स्पेक्टर:- चला येतो आम्ही. दोन दिवसांनी बरं वाटलं तर तुम्ही चौघं या धनजी सोबत पोलिस स्टेशनला.

सर्व:- व्हय साहेब.

(एवढं बोलून पोलिस निघून जातात.)

सिन नं. १५

Efect Night

(धनजी आणि त्याची बायको रात्रीच्यावेळी त्यांच्या घरांत बोलत असतात.)

धनजीः व्दारके आज आपल्यामुळं माझा लहान भाऊ चूक नसतांना जेलमध्ये बसलाय. लई चूकीच केलं आपण. पोलिसांनी उगाच मारहाण केली असणार त्याला.

व्दारकाः- आ...हा... आ... तुमच्या भावाचीच बाजू घेणार तुम्ही. आपण जे केलं ते बरोबरच केलं. तिथंच सरळ होणार तो चूक नव्हती म्हणे त्याची. झोपा आता रात्र खूप झालीय. हू .

(धनजी व व्दारका झोपतात.)

सिन नं. १६

४ दिवसांनंतर

Efect Day

(पहाटेची वेळ धनजी गोठ्याकडे म्हशीच दूध काढायला जातो.)

व्दारका:- अहो धनी कुठं निघालात? अनं तेही इतक्या पहाटे...

धनजी:- अगं व्दारके म्या दूध काढायला जातोय.

व्दारका:- अहो पण तुमची तब्येत ठिक नाही ना... चक्कर मिक्कर आली म्हणजी.

धनजी:- तु काळजी करु नकस मी ठिक आहे. येतो मी.

व्दारका:- थांबा थांबा धनी मी पण येते तुमच्या संगे.

धनजी:- नको तुझं काही काम नाही.

व्दारका:- येते म्हणलं ना !

धनजी:- बरं ये की.

(दोघं गोठ्याच्या दिशेने जातात.)

सिन नं. १७

Efect Morning

(धनजी व व्दारका गोठ्याजवळ पोहचतात. व व्दारकेला कसला तरी आवाज गोठ्यांतून ऐकू येतो. ती धनजीला सांगते. मात्र धनजी म्हणतो मांजर किंवा कुत्र असलं.)

व्दारकाः- धनी अहो धनी... कसला तरी आवाज येतोय बघा गोठ्यात.

धनजीः- अगं तुझी झोप नाही झाली वाटतं पूर्ण. कुठं आवाज येतोय तुला.

व्दारकाः- धनी जरा नीट ऐका... तुमच्या कानात काही बोळे गेलेय वाटतं.

धनजीः- अंग जावूदे आवाज येतोय खरा पण मांजर, कुत्र असलं तिथं.

व्दारकाः- धनी कोणी तरी म्हशीच दूध काढताय वाटतं? बघा धारेचा आवाज येतोय. आवाज करु नका आपण गुपचूप बघूया...

धनजीः- चल जावून बघू.

(धनजी आणि व्दारका गोठ्याजवळ पोहचतात.

गोठ्यांत डोकावून बघतात तर काय? तेथे धनजीचा जीवलग मित्र विज्या चोरुन म्हशीच दूध काढत असतो.)

धनजीः- विज्या तू...

(धनजी असं बोलताच विज्या खजिल होतो. आपली चोरी पकडली गेली म्हणून तो धनजीला बनाव करुन सांगायचा प्रयत्न करतो.)

व्दारकाः- भावजी तुम्ही?

विज्याः- होय वहिनी मी.

व्दारकाः- तुम्ही दूध काढलं आणि म्हशीनं दूध दिलं ही तर कमाल झाली!

विज्याः- होय वहिनी, म्हटलं धनजी भाऊ आजारी आहेत त्याला उगाच त्रास होऊ नये सकाळी उठायचा म्हणून त्याच काम मी केलं.

धनजीः- असं होयं. छान आणि तेही मला न सांगता...

विज्याः- व्हय...

धनजीः- विज्या बनाव करु नकोस. मी इतक्या दिवसांपासंन आजारी आहे. तू कधी स्वतःहून माझं काम केलं नाही.

आणि आज तुला माझी कीव कशी आली? पण आता मी पूर्णपणे बरा झालोय.

व्दारका:- व्हय भावजी आता धनी पूर्ण ठीक झालेत. म्हणजे तुम्हीच रोज म्हशीच दूध गुपचूप काढून चोरुन नेत असणार...!

धनजी:- विज्या म्हणजे तुच आमची दिशाभुल केली. तूच चोरी करत राहिला आणि माझ्या भावाविषयी आमच्या मनांत गैरसमज पसरवून आमच्यात भांडण लावले. आणि तुझ्यामुळेच आमच्यात भांडणं होऊन आमचा शरद आज जेलमध्ये आहे. थांब पोलिसांना बोलवून तुला त्यांच्याच ताब्यात देतो.

विज्या:- धनजी, मी तुझ्या पाया पडतो. मीच रोज म्हशीच दूध चोरुन न्यायचो. मला माफ कर! मला पोलिसांच्या ताब्यात नको देवूस. वहिनी सांगा हो भाऊला...

व्दारका:- विजय भावजी किती विश्वास होता तुमच्यावर आणि... आणि तुम्ही विश्वासघातच केला आमचा.

धनजी:- हँलो पोलिस स्टेशन, मी धनजी बोलतोय. म्हशीचं दूध चोरुन नेणारा चोरटा आज आम्ही रंगेहात पकडलाय. तुम्ही या लवकर.

(धनजी फोन ठेवतो व काही क्षणांत पोलिस येतात.)

सिन नं. १८

Efect Day

हवलदारः- धनजी पाटील तुम्ही का?

धनजीः- व्हय साहेब...

हवालदारः- कुठयं चोर?

धनजीः- हा बघा साहेब यालाच आता आम्ही दूध चोरतांना रंगेहात पकडलं.

व्दारकाः- व्हय साहेब हाच. रोज आम्ही इकडं गोठ्यावर यायच्या आधी म्हशीच दूध चोरुन नेत असल्याच त्यानं कबुल पण केलय.

इन्स्पेक्टरः- दूध चोरतो होय. (इन्स्पेक्टर त्याच्या कानात लगवतात.)

विज्याः- नाही हो साहेब मला माफ करा यापुढं मी नाही चोरी करणार. धनजी तू तरी सांग मी मित्र ना तुझा... वहिनी तुम्ही तरी सांगा. मी पाया पडतो तुमच्या.

व्दारकाः- हट कसला मित्र तू यांचा... चोर आहेस तू चोर... तुझ्यामुळे यां दोघभावांमध्ये भांडण होऊन आज आमचे शरद भावजी जेल मध्ये आहेत.

विज्याः- नाही हो माझी चूक झाली मला माफ करा. साहेब सोडा हो मला. यांपुढे नाही करणार मी असं कधी.

इन्स्पेक्टरः- चूक झाली का? आता तुच चूक दुरुस्त करं.

कोणत्या मांत्रिकाकडे घेऊन गेला होतास या धनजीला त्याला बोलवं.

विज्याः- नाही हो साहेब... आता नाही करणार असं.

इन्स्पेक्टरः- लाव फोन आणि बोलव त्याला.

विज्याः- हो बोलवतो साहेब, बोलवतो पण मला मारु नका. मी तुमच्या पाया पडतो.

(इन्स्पेक्टरने सांगितल्या प्रमाणे विज्या त्या मांत्रिकाला फोन लावून बोलवतो.)

विज्याः- हँलो बाबा मी विजय बोलतोय. त्या दिवशी नाय का? मी आणि माझा मित्र आला होतो. म्हैस दूध देत नाय म्हणून हा तेच तेच त्याची पुजा करायचीय तुम्ही यां लवकर...

(विज्या फोन ठेवतो.)

इन्स्पेक्टरः- काय रे काय म्हटला तो बाबा?

विज्याः- येतो म्हणला साहेब.

इन्स्पेक्टरः- जास्त चलाखी केली तर याद राखं.

जेवढं विचारलं तेवढच बोल.

विज्याः- व्हय साहेब मी काहीच बोलणार नाही.

इन्स्पेक्टरः- शिंदे, जाधव तुम्ही सर्व बाहेर लक्ष ठेवा. कुलकर्णी तुम्ही सिव्हील ड्रेस मध्ये आहात कोणाला संशय येणार नाही. म्हणून यांच्या सोबत थांबा. मी देखिल इथच आहे समोर झूडपात लपतोय ते आल्यावर मला इशारा करा.

कुलकर्णीः- एस सर...

सिन नं. १९

Efect Day

(मांत्रिक येतो व पुजा सुरु करतो. आता मंत्र मारल्यावर म्हैस दूध देणार अस सांगतो. पण काही केल्या म्हैस दूधच देत नाही. हे बघून भोंदू मांत्रिक तेथून पळ काढायचा प्रयत्न करतो तितक्यात पोलिस त्याला अटक करतात आणि त्याच्या ढोंगीपणाच पितळं उघडं पाडतात.)

मांत्रिकः- बोल विजय कुठयं म्हैस.

विज्याः- ही हाय महाराज...

मांत्रिक:- मी पुजेला सुरुवात करतो आधी दक्षिणा म्हणून दहा हजार रुपये मला द्या.

(धनजी व त्याची बायको एकमेकांकडे बघतात.)

कुलकर्णीः- हे घ्या बाबा.

मांत्रिकः- तुम्ही कोण?

कुलकर्णीः- मी या धनजीचा लहान भाऊ.

धनजीः- व्हय माझा लहान भाऊ हाय.

मांत्रिकः- बरं ठिक...

(मांत्रिक त्याच्या पिशवीतून नारळ, निंबू, गुलाल, अगरबत्ती आंडे काढून पुजा सुरु करतो.)

मांत्रिकः- आता बघतोच धनजी तुझी म्हैस कशी दूध देत नाय ते.

धनजीः- लई उपकार होतील बाबा...

मांत्रिकः- तुम्ही बघाच मी मंत्र मारत जाईल आणि ही म्हैस दूध देत जाऊन आपोआप सर्व बादली दूधाने भरुन जाणार. तुम्ही सर्व डोळे बंद करा. मी सांगे पर्यंत डोळे उघडू नका.

सर्वः- नाही उघडणार महाराज.

मांत्रिकः- ओम... -हीमसीम... भुत बांध चुरड बांध, बांध, बांध चिंचेला बांध,  आंब्याला बांध याला बांध त्याला बांध... बांध, बांध, बांध.

(मांत्रिक मंत्राला सुरुवात करतो. मांत्रिक अधून मधून डोळे उघडून बघतो मात्र बादली दूधाने भरतच नाही. हे त्याच्या लक्षात येतं. तितक्यात कुलकर्णी कॉन्स्टेबल साहेबांना इशारा करतो. तितक्यांत सर्व त्या मांत्रिकाला घेरतात व त्याला अटक करुन घेऊन जातात. सर्व गांव जमा झालेला असतो.)

इन्स्पेक्टरः- बांध, बांध करतो काय... बांधारे याला. लोकांना करणी कोटाळ, जादू टोणा असं खोटं सांगून फसवतोस काय. हवालदार अटक करा याला.

हवालदारः- जी सर... चल रे भडव्या. गरिब लोकांना लूटतोस काय. चल बैस गाडीत.

इन्स्पेक्टरः- तुझ्या भुत बांध चुरड बांध, बांध, बांध चिंचेला बांध, आंब्याला बांध याला बांध त्याला बांध... बांध, बांध, बांध. या मंत्राने म्हैस दूध देणार काय? तुझ्या आधीच या चोरट्याने बादलीभर दूध चोरुन काढून ठेवलय. अन आता ही म्हैस दूध कुठून देणार. या विज्याचाच हा रोजचा पराक्रम मग ही म्हैस दूध देणार तरी कुठून.  बसवा यांना गाडीत.

हवालदारः- बसा रे गाडीत.

(तेथे सरपंच व पाटील पण येतात.)

इन्स्पेक्टरः- काय सरपंच, गांवात काय चाललय याकडे लक्ष देत चला जरा. नाही तर याच्यासारखे भोंदूगिरी करणारे अंधश्रध्देचा बाजार मांडून लुटत बसतील लोकांना. काय पाटील, तुम्हीही लक्ष देत जा जरा गांवाकडे काय चाललय त्याकडे.

पाटीलः- व्हय साहेब, आमचं लक्ष असतच पण आम्ही याला रंगेहाथ पकडण्याच्या प्रयत्नात होतो.

सरपंचः- लई चालाख तो हातात सापडतच नव्हता.

इन्स्पेक्टरः- पण आज सापडाला तो अखेर. म्हणून त्याला आम्ही रंगेहाथ पकडून अटक केली.

पाटीलः- बरं केलं साहेब आता याला चांगलाच धडा शिकवा.

सरपंचः- म्हणजे तो यांपुढे अंधश्रध्देचा बाजार मांडणार नाही.

इन्स्पेक्टरः- धनजी यांपुढे अशा भोंदूगिरी करणा-यांवर विश्वास ठेऊ नका.

धनजीः- नाही ठेवणार साहेब.

(तितक्यांत धनजीच लक्ष शरद कडे जातं.)

धनजीः- शरद तू?

इन्स्पेक्टरः- होय रात्रीच पाटील आले होते. जामिनावर सुटका केली त्यांनी त्याची.

धनजीः- मला माफ कर शरद... मी उगाच या चोरट्या विज्याच ऐकत बसलो.आणि तुझ्याशी भांडलो.

व्दारकाः- भावजी मला पण माफ करा. माझीही चूक झाली.

पाटीलः- धनजी यांपुढे भावाभावांमध्ये भांडणं करु नका. आणि ती केस मागे घेऊन टाक.

धनजीः- होय पाटील, यांपुढं नाय भांडणार आम्ही कधी.

इन्स्पेक्टरः- कुलकर्णी ती फाईल घ्या गाडीतून आणि त्यावर धनजीची व त्याच्या पत्नीची सही घ्या.

कुलकर्णीः- जी सर ! धनजी आणि वहिनी यांवर सही करा.

(दोघं त्या कागदावर सही करतात.)

इन्स्पेक्टरः- यांपुढे भांडू नका. आणि हो सर्वांत महत्वाच अंधश्रध्देवर विश्वास ठेवू नका.

धनजीः- नाय ठेवणार साहेब.

ईन्स्पेक्टरः- हवालदार चला निघूया आपण.

हवालदारः- होय साहेब चला.

ईन्स्पेक्टरः- धनजी उद्या पोलिस स्टेशनला या.

धनजीः- हो साहेब.

ईन्स्पेक्टरः- चला येतो आम्ही.

(गाडी निघून जाते व जळंत्री ही कथा संपते.)

कथा, पटकथा आणि संवाद –
**बाळासाहेब सुधाकर शिंपी**,
जळगांव ता.जि.जळगांव.
(खान्देश)
मो. नं. ९९२१७२९४७५.
ईमेल आयडीः-
balasaheb.siddesh@gmail.com.

चार बुकं वाचून शहाणपण येतंय होय?

हो! आम्ही म्हणतो येतं.

वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.


मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com